www.maharashtratimes.com

मटा +TOI : पुण्यात नंबर १

# महाराष्ट्र टाइम्स


पुणे । शुक्रवार, २७ जुलै २०१८ । पाने २० (पुणे प्लससह) । शहर आवृत्ती । ₹ ४.००

# दोन भारतीयांना 'मॅगसेसे'

## डॉ. भारत वाटवानी, सोनम वांगचुक यांचा होणार गौरव



सोनम वांगचुक



डॉ. भारत वाटवानी

वृत्तसंस्था, मनिला

हजारो मनोरुग्णांना जगण्याची नवी उर्मी देणारे मुंबईचे डॉ. भारत वाटवानी आणि लडाखसारख्या दुर्गम भागामध्ये शिक्षण आणि विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये प्रयोगशील कामाद्वारे स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे सोनम वांगचुक या दोन भारतीयांना यंदाचा प्रतिष्ठेचा रेमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला आहे. आशियातील 'नोबेल' म्हणून ओळखले जाणारे हे पुरस्कार यंदा सहा जणांना जाहीर झाले असून, त्यामध्ये या दोन भारतीयांचा समावेश आहे. ३१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या एका जाहीर कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

डॉ. भारत वाटवानी यांच्या कार्यामुळे त्यांना मनोरुग्णांचा देवदूत मानले जाते. त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने रस्त्यावरील अनेक मनोरुग्ण मुले आणि व्यक्तींना आधार देऊन त्यांचे पुनर्वसन केले. या मुलांवर उपचार करता यावेत आणि त्यांना निवारा मिळावा म्हणून त्यांनी १९८८ मध्ये 'श्रद्धा पुनर्वसन केंद्रा'ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांना नवे आयुष्य देण्याचे काम भारत गेल्या अनेक दशकांपासून करीत आहेत. मनोरुग्ण मुलांसाठी अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याबद्दल वाटवानी यांचा गौरव करण्यात येणार आहे.

सोनम वांगचुक यांनी लडाखसारख्या दुर्गम भागात शिक्षण पद्धतीत कल्पक बदल केले. पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी 'आइस स्तूप' बनवले. प्रयोगशील वैज्ञानिक उपकरणांच्या साह्याने हजारो मुलांना शिक्षणाची गोडी लावली. वांगचुक यांनी लेहपासून १३ किलोमीटरवर फेय येथे मुलांसाठी शाळा सुरू केली. या शाळेत बोर्डात नापास झालेल्या मुलांना शिकवले जाते. मुलांना अभ्यासात पशुपालन, शेती, अन्नपदार्थ बनवण्याचे शिक्षण दिले जाते. शिक्षण पद्धतीत त्यांनी केलेल्या प्रयोगांची दखल पुरस्कार समितीने घेतली आहे. मॅगसेसे पुरस्कार विजेत्यांमध्ये कम्युनिस्ट बंडखोरांशी शांतता चर्चा करणारा फिलिपाइन्सच्या नागरिकाचाही समावेश आहे.

### हेही ठरले आशियाई हिरो

बहुमूल्य सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, पत्रकारिता, शांतता आणि आंतरराष्ट्रीय संबंधासाठी आपल्या कार्याचे योगदान देणारे अन्य चार आशियाईही मॅगसेसे पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. त्यात कम्युनिस्ट बंडखोरांशी चर्चा करून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणणारे फिलिपाइनचे हॉवर्ड डी, दिव्यांगांसाठी लढणारे व्हिएतनामचे पोलिओग्रस्त कार्यकर्ते वो थी होआंग येन रोम, कंबोडियाचे युक छांग आणि ईस्ट तिमोरचे मारिया डी लोर्देस मार्टिन्स क्रूझ यांचा समावेश आहे.

# खराखुरा 'आयडॉल'

आमीर खान यांच्या गाजलेल्या 'थ्री इडियट्स' या चित्रपटात गाजलेली फुंगसूक वांगडू ही व्यक्तिरेखा म्हणजेच खऱ्याखुऱ्या आयुष्यातील सोनम वांगचुक. वांगचुक यांच्या आयुष्याची वाट रूळलेली नाही. वेगळं काही करण्याच्या उर्मीने त्यांनी आतापर्यंत केलेली वाटचाल थक्क करणारी आहे.

लडाखसारख्या दुर्गम भागात वांगचुक यांनी शिक्षण, विज्ञानासारख्या क्षेत्रात आमूलाग्र बदल केले. वांगचुक यांनी १९८८ मध्ये इंजिनीअरिंगमध्ये पदवी घेतल्यानंतर लडाखसारख्या दुर्गम प्रदेशात विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम सुरू केले. त्या वेळी लडाखमधले ९५ टक्के विद्यार्थी सरकारी परीक्षांमध्ये नापास होत होते. १९९४ मध्ये वांगचुक यांनी शैक्षणिक सुधारणांसाठी ऑपरेशन 'न्यू होप' हा कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमांतर्गत त्यांनी आतापर्यंत ७०० शिक्षकांना प्रशिक्षित केले. त्याचा सकारात्मक परिणाम दिसू लागला. १९९६ मध्ये लडाखमध्ये दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांचे पास होण्याचे प्रमाण फक्त पाच टक्के होते. तेच प्रमाण २०१५ मध्ये ७५ टक्क्यांपर्यंत गेले. लडाखमधील लोकांना वितळणाऱ्या बर्फाच्या पाण्यावरच अवलंबून राहावे लागत होते. मात्र, संपूर्ण बर्फ वितळून झाल्यानंतर तिथे केवळ रेतीचे वाळवंट उरते. त्यामुळे येथील नागरिकांना पाण्याच्या समस्येला कायम तोंड द्यावे लागते. त्यावर मात करण्यासाठी वांगचुक यांनी हिमस्तुप तयार केले. हिमस्तुपाद्वारे पाणी साठवून ठेवले जात असल्याने या लोकांची पाणी टंचाईतून मुक्तता झाली आहे. शाळेची सोय नसल्याने लडाखमधील अनेक मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत होते. त्यामुळे वांगचुक यांनी लेहपासून १३ किलोमीटरवर फेय येथे मुलांसाठी शाळा सुरू केली.

शाळेत बोर्डात नापास झालेल्या मुलांना शिक्षण दिले गेले. अनेक प्रयोगशील उपक्रम या शाळेत राबविण्यात आले. सौरऊर्जेचा जास्तीत जास्त वापर, वैज्ञानिक उपकरणे, शिक्षण पद्धतीची मॉडेल असे अनेक 'प्रयोग' या शाळेत राबवले गेले. स्वतःचे डोके चालवा आणि शक्य ते नवे शोध लावा, या मानसिकतेसह शाळेत मार्गदर्शन केले जाते. पूर्णपणे सौरऊर्जेचा वापर केल्या जाणाऱ्या या शाळेत मुलांना व्यावसायिक शिक्षणही दिले जाते. एक स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर पिढी घडवण्याचे काम करणारे वांगचुक हे 'खराखुरा आयडॉल'च ठरावेत.

**यंदाचा प्रतिष्ठेचा रेमन मॅगसेसे पुरस्कार दोन भारतीयांना जाहीर झाला आहे. या दोन पुरस्कारप्राप्त व्यक्तींची आणि त्यांच्या कार्याची थोडक्यात केलेली ओळख...**

# मनोरुग्णांचा 'देवदूत'

मानसिक अस्वस्थतेमुळे एका वेगळ्याच विश्वात वावरणाऱ्या, स्वतःपासून दूर गेलेल्या आणि रस्त्यावरच आयुष्य काढणाऱ्या अनेकांसाठी डॉ. भारत वाटवानी यांनी गेल्या काही दशकांमध्ये केलेले काम उल्लेखनीय आहे. भारत आणि त्यांच्या पत्नीने या व्यक्तींना नवे आयुष्य दिले.

सुरुवातीला वैयक्तिक पातळीवर काम करणाऱ्या वाटवानी यांनी १९८८ मध्ये मुंबईमध्ये श्रद्धा फाउंडेशन नावाची संस्था स्थापन केली. रस्त्यावर राहणारे मुले-मुली, व्यक्ती यांना मानसिक अस्वस्थतेतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांसोबतच या विशिष्ट 'फेज'मधून बाहेर पडण्यासाठी वाटवानी यांनी सातत्याने प्रयत्न केले. अनेक अडचणींवर काम करून, या व्यक्तींच्या मानसिक स्थितीचा सविस्तर अभ्यास करून त्यांना नवी ऊर्जा देण्याचे काम वाटवानी यांनी केले. त्यांच्यावर योग्य उपचार करण्यात आले. मानसिक अस्वस्थतेमुळे कुटुंबीयांनी वाऱ्यावर सोडलेल्या, निराधार व्यक्तींना हक्काचे आश्रयस्थान देण्यामध्ये वाटवानी आणि त्यांच्या पत्नीनी महत्त्वाचे काम केले. स्किझोफ्रेनियासह विविध मानसिक आजार झालेल्यांच्या पुनर्वसनाचे काम 'श्रद्धा रिहॅबिलिटेशन सेंटर' सातत्याने काम सुरू आहे. सध्या बोरिवली येथे संस्थेचे काम सुरू असून, सुरुवातीच्या टप्प्यात दहिसर येथे संस्थेने काम सुरू केले. बाबा आमटे यांनी आनंदवनात केलेल्या कामापासून प्रेरणा घेऊन या संस्थेने आपली वाटचाल सुरू ठेवली.

सुरुवातीच्या टप्प्यात मुंबईत काम केल्यानंतर मुंबईबाहेरील व्यक्तींवर उपचारासाठी कर्जतजवळ अंदाजे साडेसहा एकरांवर संस्थेने स्वतःची इमारत उभी केली. आमीर खानच्या 'सत्यमेव जयते' या कार्यक्रमात या संस्थेच्या कामाची दखल घेतली गेली. अनेक व्यक्तींना संस्थेच्या कामातून सकारात्मक ऊर्जा मिळाली आणि त्यांचे नवे आयुष्य सुरू झाले. संस्थेकडे आज अशी अनेक उदाहरणे आहेत. काही व्यक्ती आयुष्यात पुन्हा झेप घेतील अशी शक्यताही नव्हती; पण डॉ. भारत वाटवानी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे हे शक्य झाले.